# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०७/०४/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

### घरफोडी

**१) पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ५ कि. मी. अंतरावरील फिर्यादीचे राहते घर निलज (खंडाळा) ता.पारशिवनी कन्हान येथे दिनांक दि. ०६/०४/२०२२ चे २३.०० वा. ते ०७/०४/२०२२ चे ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— अजाब कवडुजी कारेमोरे, वय ४६ वर्ष, रा. निलज (खंडाळा) हे आपले घरी रूम मध्ये झोपले असतांना अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने लोखंडी आलमारीतील सोन्या—चांदीचे दागिने कि. ३,२०,०००/—रू. चा मुद्देमाल तसेच कपाटातील नगदी कॅश १,००,०००/—रू. असा एकुण कि. ४,२०,०००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार नरेश श्रावनकर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री यशंवत कदम मो.नं. ७०८३७११९६९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत मौजा वार्ड क्र २ फेटरी जि. नागपुर येथे दिनांक ०६/०४/२०२२ चे १३.०० वा. ते १४.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— पीयुष जितेन्द्र ढोणे, वय २० वर्ष, रा. वार्ड क्र २, फेटरी जि. नागपुर हा घरी हजर नसतांना त्याच्या घराच्या दाराचे अज्ञात आरोपीने कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने आलमारीत ठेवलेले सोन्या—खंदीचे दागिने किंमती. ५६,०००/—रू. व नगदी २,०००/—रू. असा एकुण कि. ५८,०००/— रू.चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार मन्नान नौरंगाबादे हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील सेन्ट्रल बॅक जवळ काटोल येथे दिनांक ०६/०४/२०२२ चे १४:२० वा. ते १४:४० वा. सुमारास फिर्यादी नामे— विनोद रूपरावजी निबुळकर, वय ३२ वर्ष, रा. सिर्सावाडी ता. काटोल हे गुलाबी रंगाच्या थैलीत २,९०,०००/—रू. टाकून ती थैली मोटर सायकलचे हॅन्डला लटकवुन सेन्ट्रल बॅक काटोल समोर रोडवर उभे होते. त्यादरम्यान सोनार ओळी काटोल कडून पल्सर मोटर सायकल ने येणारे दोन अज्ञात आरोपी पैकी मोटरसायकल वर मागे बसलेल्या आरोपीने फिर्यादीने मोटर सायकलचे हॅन्डल ला लटकवुन ठेवलेली पैश्याची थैली काढून घेवून मोटर सायकलने पसार झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि बोंदरे मो.क्र. ९८२३९०४१४१ हे करीत आहे.

## जबर दुखापत

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील खापरी केने येथे दिनांक ०१/०४/२०२२ चे १६:०० वा. सुमारास फिर्यादी नामे— सौ. सोनी अशोक मोगरे वय ५० वर्ष रा.खापरी केने व आरोपी क्र. १) प्रभाकर मोगरे, २) राजकुमार मोगरे, ३) रेखा मोगरे तिन्ही रा. खापरी केने हे नातेवाईक आहेत. फिर्यादीने आरोपी क्र. १ यास तीन टिना आठ दिवसाआधी दिल्या होत्या फिर्यादीने टिना परत मागीतल्या असता दोन दिवसा आधी आणुन दिल्या. घटना तारखेला तिन्ही आरोपी हे अर्जदाराचे घरी आले व फिर्यादीस 'तु टिना परत का मागीतल्या याकारणावरून फिर्यादीसोबत वादविवाद करून आरोपी क्र. १ व २ यांनी काठीने फिर्यादीचे मुलगा प्रविण याला पाठीला व टोंगळयाला मारल्याने मुका मार लागला व आरोपी क्र. ३ हीने फिर्यादीचे केस पकडून ढकलढुकल केले व शिवीगाळ करून पुन्हा मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ५०४, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा मोरे मो.क्र. ९०४९६०७११५ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**